# प्रोफेक्टस कॅपिटलची २०५ कोटींची निधी उभारणी

**मुंबई:** सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना वित्तपुरवठ्यावर केंद्रित बँकेतर वित्तीय कंपनी प्रोफेक्टस कॅपिटलने, अपरिवर्तनीय रोखे (एनसीडी) जारी करून इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशनकडून २५ दशलक्ष डॉलर (सुमारे २०५ कोटी रुपये) उभे केले आहेत. भारतातील लघुउद्योगांसाठी वीज-कार्यक्षम यंत्रसामग्रीला वित्त पुरवण्यासाठी आयएफसीने केलेली ही पहिली गुंतवणूक आहे. या एनसीडीला 'हरित रोखे' अशी श्रेणी मिळाली असून, मिळालेल्या रकमेचा वापर प्रोफेक्टसकडून वीज कार्यक्षम आणि हरित मालमत्तांसाठी केला जाणार आहे.